महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ६० वे | दिनांक : २०/०२/२०२६ | वार : शुक्रवार

## मोदी सरकारचा अमेरिकेसमोर लोटांगण - सचिन पायलट



**मुंबई :** व्यापार करार हे आर्थिक प्रगतीसाठी असावेत, पण ते देशाच्या सार्वभौमत्वाचा बळी देऊन केलेले नसावेत. मोदी सरकारने अमेरिकेच्या दबावाखाली केलेला व्यापार करार हा भारतातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेसाठी आत्मघातकी ठरणार आहे. हा करार म्हणजे देशाच्या अन्नदात्याचा गळा घोटणारा प्रकार असून, भारतातील 144 कोटी जनता ही गुलामी कधीही स्वीकारणार नाही, असा घणाघाती हल्ला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस सचिन पायलट यांनी आज येथे केला.

टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत सचिन पायलट बोलत होते. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मोदी सरकारवर टीकास्त्र सोडताना सचिन पायलट म्हणाले की, या करारानुसार अमेरिकन कृषी उत्पादनांना भारतात शुल्कमुक्त प्रवेश मिळणार आहे. यामुळे महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा आणि पंजाबमधील कापूस, सोयाबीन, मका आणि सुका मेवा उत्पादक शेतकरी देशोधडीला लागतील. "अमेरिकेच्या शेतमालाला भारतात शून्य टक्के कर, तर भारताच्या शेतमालावर 18 टक्के कर, हा कोणता न्याय?" असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

रशिया आणि इराणकडून स्वस्त तेल खरेदी न करण्यासाठी अमेरिकेने भारतावर दबाव आणला आहे. यावर भाष्य करताना पायलट म्हणाले, स्वस्त पर्याय सोडून महागडे तेल खरेदी करणे हे देशहिताचे नाही. मोदी सरकार 'मजबूत' नसून 'मजबूर' सरकार आहे. यामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर आणि डिजिटल गोपनीयतेवर गंभीर परिणाम होणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांची तुलना माजी पंतप्रधानांशी करताना पायलट म्हणाले, इंदिरा गांधींनी कधीही अमेरिकेच्या दबावापुढे मान झुकवली नाही, उलट त्यांनी कणखर भूमिका घेत पाकिस्तानचे दोन तुकडे केले. डॉ. मनमोहन सिंग यांनीही अणुकरार करताना भारताच्या अटींवरच स्वाक्षरी केली होती. मात्र, आजचे नेतृत्व अमेरिकेसमोर झुकलेले दिसत आहे.

यावेळी पायलट यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या सुरक्षेचा मुद्दाही उचलला. ज्या परिवाराने देशासाठी दोन बलिदानं दिली, त्या राहुल गांधींना जाहीरपणे धमक्या दिल्या जात आहेत. त्यांची एसपीजी सुरक्षा काढून घेणे आणि केंद्रीय मंत्र्यांनी त्यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधाने करणे हे लोकशाहीला घातक आहे, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

## अमृता फडणवीस यांचा ॲक्सिस बँकेच्या वरिष्ठ उपाध्यक्ष पदाचा राजीनामा




**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी ॲक्सिस बँकेतील २३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर वरिष्ठ उपाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. २३ वर्षांपूर्वी व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी म्हणून आपल्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात करणाऱ्या अमृता फडणवीस यांनी या काळात शाखा संचालन, कॉर्पोरेट बँकिंग आणि ट्रेझरी यांसारख्या विविध विभागांमध्ये महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या. या प्रदीर्घ प्रवासानंतर अखेर त्यांनी वरिष्ठ पदावरून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे.

याविषयी अमृता फडणवीस यांनी ट्विट करत माहिती दिली की, २३ वर्षांपूर्वी मी ॲक्सिस बँकेमध्ये मॅनेजमेंट ट्रेनी म्हणून रुजू झाले होते. आज मी कृतज्ञतेने भरलेल्या अंत:करणाने वरिष्ठ उपाध्यक्ष पदावरून निवृत्त होत आहे. या काळात मला शाखा व्यवस्थापनापासून ते कॉर्पोरेट बँकिंगपर्यंत आणि ट्रेझरीपासून ते कस्टमर रिलेशन विभागापर्यंतचा अनुभव मिळाला, त्यामुळे ही संस्था माझं कुटुंब, शिक्षक आणि दुसरं घर राहिली आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

## मराठी लोकांनी गुजरातमध्ये जाऊन व्यवसाय करावा : गुजराती लोकांनीच इकडे यावे असे काही नाही, मंत्री गणेश नाईक



**पालघर :** मुंबईत ते गुजरात असा बुलेट ट्रेनचा मोठा प्रकल्प येणाऱ्या काळात सुरू होणार आहे. यावरून गुजराती लोक मुंबईत येऊन व्यवसाय सुरू करणार आणि मराठी माणसाला मुंबईच्या बाहेर जावे लागणार अशी टीका विरोधकांनी केली आहे. यावर आता भाजप नेते व मंत्री गणेश नाईक यांनी मोठे विधान केले आहे. येत्या काळात बुलेट ट्रेन सारखा मोठा प्रकल्प सुरू होणार असून यातून गुजरातमधील लोकांनी महाराष्ट्रात येऊ नये तर महाराष्ट्रातील लोकांनी देखील गुजरातमध्ये जाऊन व्यवसाय सुरू करावे, असे नाईक यांनी म्हटले आहे.

पालघर जिल्ह्यातील शिरगाव समुद्रकिनाऱ्यावर आयोजित ग्लोबल कोकण महितसव 2026 आणि कोकण सरस प्रदर्शनाचे उद्घाटन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते पार पडले. यावेळी ते बोलत होते. 18 ते 22 फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या या महोत्सवामुळे ग्रामीण भागातील उद्योगांना मोठी बाजारपेठ मिळेल, असा विश्वास यावेळी गणेश नाईक यांनी व्यक्त केला आहे.

गणेश नाईक यावेळी बोलताना म्हणाले, बुलेट ट्रेन प्रकल्पाचा फायदा घेऊन गुजरातमधील लोक महाराष्ट्रात तर येतीलच पण महाराष्ट्रातील लोकांनी देखील गुजरातमध्ये व्यवसाय सुरू केले पाहिजेत. गुजराती लोकांनीच इथे व्यवसाय सुरू केले पाहिजे असा काही सिद्धांत नाही, असे विधान नाईक यांनी केले. दरम्यान, बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे महाराष्ट्र आणि गुजरात यांच्यातील दळणवळण अधिक वेगवान होणार आहे. या पार्श्वभूमीवर गणेश नाईक यांनी असे विधान केले आहे. तसेच चार दिवस चालणाऱ्या या महोत्सवामुळे ग्रामीण भागातील व्यावसायिकांना रोजगाराची मोठी संधी मिळेल, असा विश्वास देखील यावेळी नाईक यांनी व्यक्त केला आहे.

कोकण भूमी प्रतिष्ठान आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा महोत्सव कोकणातील निसर्गसंपदा, पर्यटन, लोककला आणि ग्रामीण उद्योगांना जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठी सज्ज झाला आहे. उत्तर कोकणापासून ते थेट तळकोकणापर्यंत पसरलेल्या या अथांग किनारपट्टीवर प्रथमच इतक्या भव्य स्वरूपात बीच फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले असून, याद्वारे कोकणच्या सांस्कृतिक आणि औद्योगिक वैभवाचे दर्शन घडवण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला आहे.

या महोत्सवात पर्यटकांसाठी विविध उपक्रमांची मेजवानी असणार आहे. यात 400 हून अधिक स्थानिक उद्योजकांचे स्टॉल्स आणि 100 पेक्षा जास्त महिला बचत गटांचे विशेष प्रदर्शन भरवण्यात येणार असून, कोकणी खाद्यसंस्कृतीचा अस्सल आस्वाद देणारा फूड फेस्टिवल हे मुख्य आकर्षण ठरेल. यासोबतच मराठी चित्रपट महोत्सव आणि 150 कलाकारांचा सहभाग असलेले 'राजा रयतेचा' हे भव्य महानाट्य या महोत्सवाची रंगत अधिकच वाढवणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० फेब्रुवारी २०२६


## जे. ई. एस. महाविद्यालय जालना येथे शिवजयंती उत्साहात साजरी



**जालना (राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालना येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा डॉ राजेंद्र सोनवणे, पर्यवेक्षक प्रा. ज्ञानेश्वर धनवे, प्रा. महेश सोनी, डॉ. स्वप्नील सारडा, प्रा. शिवनारायण ताठे, प्रा. विजय शिंदे, प्रा. जगदीश मुळे , प्रा. अजिंक्य देशमुख आदि उपस्थित होते.

## शिवजन्मोत्सव निमित्त पारंपरिक खेळ आणि शिवकालीन वेषभूषा स्पर्धा



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शिवजयंती निमित्त भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्षा अमोल शिवाजीराव मोरे आणि सहसचिव डॉ सुभाष वाघमोडे यांच्या हस्ते शिवरायांना अभिषेक पूजा आणि अभिवादन करण्यात आले. यावेळी वेषभूषा स्पर्धा आणि लाठी, काठी आणि दांडपट्टा सादरीकरण. वेषभूषा स्पर्धेत छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, मावळे सैनिक, तानाजी मालुसरे, संत समर्थ रामदास, इतर शिवकालीन व्यक्ती, नागरिक यांच्या प्रतिमेचे हुबेहुब सादरीकरण केले.आयन शेख याचा दांडपट्टा आणि लाठी-काठी सादरीकरणाचे कौतुक करण्यात आले.महाराजाच्या वेषभूषा प्रथम क्रमांक सुशिल सूर्यवंशी द्वितीय क्रमांक आरती सोनकांबळे, हर्षदा ममाले, अश्विनी पाटील, वैष्णवी काळे, आयन शेख आणि हर्षदा सूर्यवंशी दांडपट्टा विशेष पुरस्काराने सन्मानित तर दुसऱ्या गटात प्रतीक्षा दुरगुडे आणि. स्नेहा चौहान तसेच छोट्या जिजाऊं वेषभूषातील कु. तृप्ती नितीन कोराळे, आणि स्वाधिका बिराजदार यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सर्व विजेत्यांना रोख बक्षीस आणि प्रमाणपत्राचे वाटप संस्थेचे सहसचिव डॉ सुभाष वाघमोडे, प्राचार्य डॉ संजय अस्वले यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. पी. ए. पिटले पर्यवेक्षक शैलेश महामुनी यांची उपस्थिती होती. या उपक्रमांसाठी निमंत्रित मान्यवर, महाविद्यालयाचे आजी माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनीं मोठया संख्येने हजर होते.


### जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-


## विश्वकर्मा विद्यालयात निरोप समारंभ



**छत्रपती संभाजीनगर :** येथील विश्वकर्मा माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी स्वयंशिस्त, कष्ट व वेळेचे नियोजन गरजेचे असते. शालेय जीवनात विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होत असतात. त्यांचा सर्वांना आयुष्यात खूप उपयोग होतो. आपण सुशिक्षित होत असताना सुसंस्कारित होणे ही महत्त्वाचे असते. असे मार्गदर्शन शाळेतील शिक्षकांनी केले. यावेळी मुख्याध्यापक प्रदिप भाले म्हणाले की, "शाळेतील दिवस केवळ अभ्यासापुरते सिमित नसतात, येथे मिळालेले अनुभव, संस्कार आणि मूल्येच आयुष्याचा खरा पाया घडवतात." "शाळा ही केवळ ज्ञानाचे केंद्र नसून, येथे मिळणारे अनुभव, संस्कार आणि मूल्येच आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आधारस्तंभ ठरतात" असे अनमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पंडित शिंदे तर प्रमुख पाहुणे म्हणून रमेश जोशी, आवेज शेख यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी रोजेकर यांनी केले तर आभार नृसरत सय्यद यांनी मानले. यावेळी प्रदिप भाले, अजमेरी शेख, नाजेरा शेख,शितल मुरकुटे यांची उपस्थिती होती.

## संघर्ष व मानवतेचे राष्ट्रीय तत्वज्ञान म्हणजे शिवराय होत - डॉ. संजय खरात



**छत्रपती संभाजीनगर :** सर्व सामान्य जनतेच्या तनामनाचा स्वयंभू राजा, अठरापगड जाती गोरगरीबांचा त्राता ,जुलमांधाचा कर्दनकाळ न्याय्य विवेकी लोकसत्ताक स्वराज्याचे संस्थापक म्हणून शिवराय गौरविले जातात, संघर्ष व मानवतेचे राष्ट्रीय तत्वज्ञान म्हणजे छत्रपती शिवराय होत,असे प्रतिपादन प्रा.डॉ. संजय खरात यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात शिवजन्मोत्सव सोहळ्यात विविध स्पर्धा उपक्रमात मार्गदर्शन करतांना डॉ. खरात यांनी शिवरायांच्या मावळ्याचे योगदान, तत्कालीन मुघल, आदिल, निजामशाहीसह स्वकीय पाटील वतनदार मुजोर सरदारांच्या उरात धडकी बसवण्याचे कार्य करीत जाती धर्म व्यवस्थेला तिलांजली देत, मानवतेचा, समता बंधुतेचा दिनदुबळयांचा आधार म्हणजे शिवराय होते , शत्रुंच्याही विश्वासाला उतरलेले महान राजे म्हणजे शिवराय होत,असे स्पष्ट केले.यावेळी आदित्य इंगळे, मीना कचरे, सुहानी खंडारे,वर्षा आठवले, साक्षी आठवले यांनी मनोगत व्यक्त केले, शिवजन्मोत्सवात निबंध, वक्तृत्व, भित्तिपत्रक,प्रश्न मंजुषा आदी स्पर्धा घेण्यात आल्या प्रारंभी डॉ. नवनाथ गोरे यांनी प्रास्ताविक केले, उपप्राचार्य प्रा.एन.एम करडे यांनी वसा व विचार शिवरायांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. आर. व्ही .मस्के यांनी शिवराय हे वैश्विक प्रेरणा पुरूष असल्याचे विविध संदर्भ देत स्पष्ट केले. कार्यक्रमासाठी डॉ. एस.पी. खिल्लारे, डॉ. एस.पी.बुधवंत,डॉ. व्ही.जी. पिंगळे,डॉ. प्रज्ञा रुईकर साळवे यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संघरत्न गवई यांनी तर आभार डॉ. बी.एन. शिंदे यांनी व्यक्त केले सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालयीन अधीक्षक राजू पट्टेकर,डॉ. राजेंद्र शेलार,डॉ. प्रकाश भालेराव, डॉ. आरती निशांतराव, डॉ. गौतम घाडगे,डॉ. रेश्मा गरड यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० फेब्रुवारी २०२६


## माधवराव पाटील महाविद्यालयात शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारतीय आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती श्री माधवराव पाटील महाविद्यालयात गुरुवारी (ता.१९) रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना प्रा. डॉ. महेश मोटे म्हणाले, शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल काळामध्ये दूरदृष्टी डोळ्यासमोर ठेवून अनेक गड-किल्ले आपल्या ताब्यात घेतले. त्यांच्या पूर्ण जीवनामध्ये स्वकीय व परकीय यांच्याबरोबर लढा उभारत रयतेचा राज्यकारभार, कुशल प्रशासन, सर्वधर्मसमभाव, स्त्रियांचा सन्मान राखत सुराज्य निर्माण केले. प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. राजकुमार रोहीकर, डॉ. संध्या डांगे, डॉ. जयश्री सोमवंशी, डॉ. रवींद्र गायकवाड, डॉ. सायबण्णा घोडके, डॉ. नागोराव बोईनवाड, डॉ. दिनकर बिराजदार, डॉ. नरसिंग कदम, डॉ. रवींद्र आळंगे, प्रा. गोपाळ कुलकर्णी, डॉ. अरुण बावा, डॉ. महादेव कलशेट्टी, डॉ. रमेश आडे, प्रा. सोमनाथ व्यवहारे, प्रा. अशोक बावगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. राजू ढगे, सुरेखा पाटील, दत्तू गडवे, नितीन कंटेकुरे, लालअहमद जेवळे, चंद्रकांत पुजारी, दिलीप घाटे, इसाली चाऊस, व्यंकट मंडले आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. किरण राजपूत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी आभार मानले. यावेळी बहुसंख्येने विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, कर्मचारी उपस्थित होते.

## मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर शाळेत शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषण, नृत्य व पोवाडा सादर करून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांनी भूषविले, तर सूत्रसंचालन सहशिक्षक श्री. सचिन गायकवाड यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षकांची उपस्थिती लाभली.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार घराघरात पोहोचले पाहिजेत - प्रा. किरण सगर



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे होत असताना आपल्या एकाही लोकशाही सरकारला शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढता आला नाही. उलट शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करत असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यकारणी सदस्य प्रा. किरण सगर यांनी केले. महात्मा बसवेश्वर पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ व्या जयंतीचे औचित्य साधून गुरुवारी (ता.१९) रोजी श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था व महात्मा बसवेश्वर सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन कट्टाचे उद्घाटन प्रा. किरण सगर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत महात्मा बसवेश्वर आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पतसंस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे होते. यावेळी माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ. नितीन डागा, महाराष्ट्र पत्रकार संघाचे विभागीय उपाध्यक्ष प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, संस्थेचे सचिव कमलाकर जाधव,संचालक अमृत वरनाळे, विजय काशेट्टी, अशोक जाधव, श्रीशैल बिराजदार, शिवराज समन, बाबासाहेब पाटील, वंदना सोनवणे, इंद्रजित लोखंडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना सगर म्हणाले की, महाराजांचे लोककल्याणकारी राज्य हे रयतेचे राज्य होते. त्यांना स्वतःपेक्षा आपल्या प्रजेची जास्त काळजी वाटत होती.वतनदार महसूल ग्रामाधिकारी यांच्या भ्रष्टाचार आणि लाचखोरी विरोधात त्यांनी कठोर पावले उचलली होती. त्यांनी वसुलीची मनमानी पद्धत बंद करुन योग्य नियमावली तयार करुन सारा वसूली केली. शेतकऱ्यांना बी बियाणे, मशागत याकरिता व्यवस्था केली.जमीन मोजणी करुन कर ठरवून दिला. त्यांनी आपल्या सैनिकांना स्पष्ट आदेश दिले, ‘ शेतकऱ्याच्या भाजीच्या देठाला आणि गवताच्या काडीलाही हात लावू नका, पाणवठ्यातून गरजेपेक्षा जास्त पाणी घेवू नका, फुकट काही घेवू नका ’ आज सरकार विकासाच्या नावाखाली गरीब शेतकऱ्यांच्या आणि आदिवासींच्या जमिनी मूठभर उद्योगपतींच्या घशात घालण्याचा घाट घालत आहे. आज देशात महिला सुरक्षित नाहीत. शिवाजी महाराज महिलांचा खूप आदर करत. त्यांच्या राज्यात महिला पूर्णपणे सुरक्षित होत्या. या शिवजयंतीच्या निमित्ताने सर्वांनी मिळून प्रतिज्ञा करूया की, कोणत्याही अन्यायी, अत्याचारी आणि जुलमी सत्तेपुढे गुडघे टेकणार नाही, आपल्या धार्मिक उन्मादात देशाच्या सद्भावनेचा बळी देणार नाही, सर्व जाती, धर्माचे आणि पंथाचे लोक एकत्र गुण्या-गोविंदाने राहू, एकमेकांच्या भावनांचा आदर करू आणि शेतकऱ्यांना त्यांचे हक्क मिळवून देऊ असे मत मांडले.मनोगत व्यक्त करताना प्रा. डॉ. महेश मोटे म्हणाले, वाचन संस्कृती जोपासून वाचनाप्रती विद्यार्थ्यांना मनात गोडी निर्माण व्हावी, या उदात्त हेतूने वाचनालयामार्फत वाचन कट्टा स्थापन करण्यात आला आहे. यामुळे चांगल्या विचारांची देवाण-घेवाण होणार असल्याचे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले. दत्तात्रय इंगळे यांनी पतसंस्थेच्या वाढता आलेख यावेळी मांडला. शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे, चिदानंद स्वामी, प्रशांत काशेट्टी, सचिन कंटेकुरे, नेहा शेवाळकर, राजेंद्र मुदकण्णा, संतोष मुदकण्णा, महांतय्या स्वामी, गुंडेराव गुरव आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर मनोगत व्यक्त करताना संस्थेचा लेखाजोखा मांडून संस्थेच्या सर्व विषय पत्रिकेचे वाचन केले. सूत्रसंचालन किरण गायकवाड तर मनीष मुदकण्णा यांनी आभार मानले. यावेळी बहुसंख्येने नागरिक, कर्मचारी उपस्थित होते.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.



इरफान इनामदार

मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

**साहिल**


कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० फेब्रुवारी २०२६

# भवर भिंगरी : अस्सल अनुभूतीची निर्लेप नितळ कविता




कविता किती अंतरंगी मुरलेली असते.तिचा भावतरंग मनात हळूवार स्पर्श करून जातो तीचं कविता निस्सीम भक्तीची विराणी असते.नेमका हाच मोहमयी आशय कवीजयदीप विघ्ने यांच्या या अस्सल ग्रेस वळणाच्या या कविता भावव्याकुळ करून जातात.हा स्वर भवर अतिशय मनस्वी प्रेमाचा शब्दांनुबंध मांडीत ही कविता नितांत नितळ शितळ निर्लेप प्रेमाची अनुभूती देते.आपल्या बालपणीच्या गाव शिवाराचं गोंदण ते हळूवार प्रेमाची सय ही कविता देऊन जाते.ही कविता सदोदित तिच्या मोहाच्या जाळ्यात 'स्व'ला गुंफून आपल्या सृजनशील स्नेहाळू भावनेचा ओलावा कायमचं देतं राहते.सखीचं प्रेमळ नितळ झरणं अन् कवीच्या मनाचं भावविभोर होऊन भव्य भिंगरी होऊन शब्द शिवारात नांदत राहणं.ही कविता इतकी तालेवार रेशीम बंधनात बांधली आहे की,टंटणीचा पाला मनाच्या शिवारभर व्हावा तसं.गावगोंदण ते शिवार पांदण,सखीचा हळवा पदर ते विटी दांडूचा ठोकी कदर.ही या कवितेची सृजन सल आहे.कवी जयदीप विघ्ने यांची गझल त्याचं मर्मबंधातली आहे.ही कविता संयत प्रेम शब्दबंधात मनस्वी आ शयाने गुंफून येते. "निखळावे हसता हसता, ताऱ्यांचे येणे - जाणे.चिमण्यांच्या चोंचीमध्ये, दाण्याने गावे गाणे."(पृष्ठ ७४)कवीस्नेही सन्मित्र जयदीप विघ्ने याचा अतिशय आशय संपन्न भाव चिंतन कविता मनाच्या खोल कप्प्यातलं भावबंधाचं एक भवर जे कवीला कायमचं भावविभोर करून जातं.जेंव्हा लोणार सरोवराचा उल्का इतक्या सैराट वेगाने या भूईतळी आली तिला किती ओढ होती.ती इतकी तिच्या अतुट प्रेमाचं खोल ओलं घेऊन येणार प्रेमाचं सरोवर झालं.ही कविता तरल गेयता अनुबंध घेऊन आलेली आहे.भवर भवर गिरकी भवर,मन चिंबून येते लहर. असाचा प्रेमाचा भाव व्याकुळ होऊन ही कविता अलगद मनाचा ठाव घेते.जसे "न्यायदेवे! माझी कर, देहधून तडीपार, ऐक इतकेच उल्के.. मला होऊ दे लोणार... कानावरी ब्रम्हांडाच्या, तुझी पोचवं तू किर्ती चाव आत्मभान माझे, मला पाड धारातीर्थी "*(पृष्ठ ७) आज गाव शिवारात रस्ते गेले झाडं तुटले,पारावर बसायला म्हतारे राहिले नाही.रोजंदारीवर उपजीविका करणारी काळी सखू पिवळी धंम्मक झाली कारण तिच्या पडितातून समृद्धी महामार्ग गेला.ती सोन्यानं नटली.कविता अशी, अभंग *"काळीजर सखू, झाली गोरीपान गिळले रे रानं समृद्धीने..."*वाऱ्याचेअंगी बळ आले की तंगी मालामाल होते.सखी साठी अनेक संकटे त्यावर मात व दुःखावर कुर्निसात.मनच्या अंगनात जुनी सल मनाला बिलगते तेव्हा मृत्यूची स्तब्धता कवीने अनुभवली आहे.बाई म्हणजे मुलगी, बायको,आई तर बाई म्हणजे जन्माचा आशय रेखाटणारी आई.पश्चताप म्हणजे..म्हसनातलं सारवण.मायेच्या कुशीत लेकरू होऊन झोपायचं राहुन गेलं (पृष्ठ १२)वय घसरतचंराहते.मनाचं गोडगुपीत नातं जुळविताना तुझ्या लेकीचा तोंडवळा कसा जुळतो ग बाई..हीच माया मनाच्या कप्प्यात जपून ही कविता मनाच्या तळाशी जाऊन हळूवार स्पर्शून जाते ती ओंजळभर मायाळू प्रेम देते. "अशी वेड्यागत माया, कुणी भरली उरात धारा काढणाऱ्याचाही, गाय चाटायची हात कधी भोळा कधी वेडा, कधी होऊ दे! विहिर माझ्या मनाच्या गाईला, दे तू इतकाच धीर"(पृष्ठ १५)एक नितांत श्रद्धेचा ओलावा या कवितेने दिला आहे.कानाच्या बोगद्याला बुजून घ्याव,या डोळ्याचा कासरा नाहीच अवरता येतं.तसं हे मनाचा चाभरा आवेग.मनालामळ आहे तो खेळ होऊ द्यायचा नाही.त्याची लेंडी पाखंडी होऊ द्यायची नाही हे निश्चित निर्लेप प्रेम या कवितेने दिले आहे.ज्याप्रमाणे पेटल्या वातीला वारा हेलकावा देतो तेंव्हा अमोघ ओढीने रात अलवार होऊन या स्तनाग्राला शहारून टाकते.म्हणून या उधाण वाऱ्याला धरातचं येतं नाही कारण तो जात्याचं चपळ आहे.हे अलवार कोंब फुटावे तशी ही प्रेमळ मयाळू कविता.मनाचा मेलेला हूरूप,पायात ठणकणारे कुरूप,हीच सल उपवर होते.जणू या ठणकेचेचाळे, तिला अलगद डोहाळे मग कवी तिला डोळ्यातले धुके वाच म्हणतो,रानात नित्य हरिपाठ चालू असतो.बाई मनाच्या कोपऱ्यात निंदते.सांज ढळताना दोन भाज्या चार शेंगा पदरात बांधून घराकडे निघते तेव्हा रानं वळून बघते.टचकन याद येते पिल्यांना रानमेवा घेतला नाही.हे असं आता राहिलं नाही रानाची वाट अंधुक झालीपण बाईचा चुलीवरचा हरिपाठ चालूच आहे.भूतकाळातमन रमते,ही शाळकरी गोष्ट आहे.तो तिच्या दारावर उभा.पण पाहुणा म्हणून.ती सदन,श्रीमंत याचं मन मळकट होऊन जळत राहतं तिनं घातलेली आन.त्यालामोडता येत नाही.कासेवरची गोमाशी होऊन मन चिकटूनजाणे,कडूनिंबाचा मोहर वेणीत कसा माळावा.या देहाचे गणित कसे सोडावे.थांब्यानं कुठं थांबायचं अशी आमराई राहिली नाही.हा तहानेच तह चालूच आहे.नदीचा गोटा होऊन जगणं आलं.रान शिवार,मळवाट,नदीकाट हे काहीचं राहिले नाही मनचक्षुत एक साक्षात बोच आहे. "कधी नागीण शेलाटी कधी साळूंकीची चोच, तुझा निसटला स्पर्श उभ्या आयुष्याला बोच.."(पृष्ठ ५७)एक तरल तंवग होऊन शब्द संयत मदमोहाचे अंबर होऊन ही कविता खोल तळ ढवळून काढते.पडझड,काटेकोर माणूस उपसून फेकला पाहिजे, हिरोशिमा,वेडाबाई, तरंग निमुळती,मन झालंय राडवं,तुझी नको शिवाशिव, बुद्धीच्या बळावर,'कवटी तडकून मेंदू गहाळ व्हायच्या आधी'झालंझालं अवघड,गाय झाली कालवड,गोसावी,देह,या कवितेने अस्वस्थ मनाची अस्सल सल उजागर केली आहे. "दोन बुबुळाची होती ,वाट बघण्याची ख्याती. ये गं ये गं माझे सई,जन्म सरलेत साती."(पृष्ठ ५३)एक सृजनशील भावनेची ओढाळ ओढ. सखे साजणी सईतीची अलवार ओढणी घाली भुर्रळ मोहिनी.ही मालन भिंगरं भिवरी होऊन कवीच्या प्रतिभेचा परमोच्च बिंदू या कवितेनं आविष्कृत केला आहे.'भंडारभोग' या सिध्दहस्त कांदबरीकार राजन गवस लिहितात "जयदीप विघ्ने यांच्या कवितेने लक्ष वेधले.अंभग,ओवी या सारख्या रचनाबंधाचा वापर करून हळुवार भावनांचा मनमोहक पिसारा ही कविता आपोआप फुलवते.मानवी भावभावना आणि संवेदना शब्दबध्द करताना कवितेतील शब्द अत्यंत हळूवार होत जातात.ही कविता व्यक्ती जीवनातील आशा निराशा जशी आपल्या समोर ठेवते तशीच भोवतालच्या तान-तनावानाही तितक्याच सहजपणे शब्दबध्द करते"(पाठराखण) ही कविता एक हळव्या मनाचा कांगोरा आहे.कवीला एकूनच भुरळ घातल्यावानी आपलं गावं शिवार,तिथलं प्रेम,गाई गोठा,भूक दैन्य दारिद्रय या साऱ्या आठवांचा कढ दाटून येतो.या कवितेचा मर्मग्राही आस्वादक वैशिष्ट्ये म्हणजे गाव शिवाराचा शिवारमाथा होऊन मुक्त आशयघन भाव व्याकुळ भवर भिंगरी बांधून रानवाटा तुडवित जाणारी कविता आहे. "माझे अक्षर जाणीव,माझा शब्द-शब्द कीव नाही कवीचा भरोसा,लाव कवितेला जीव"(पृष्ठ ८४)ही सखेला सजग करणारी कविता.डोहकाट,कित्येक जीवांना बांधून ठेवतो तिच्या सुटणाऱ्या गाठी पाहण्यासाठी.डोळ्यात साठवलेले तिच्या देहाचे तांडव तुझा वेल माझा मांडव ही मनमुग्ध ओळ तर आंघुळ, मृदंग बाप दींडीत दंग,ढग पांडुरंग असे युगे अठ्ठावीस गेली.बळीचा बळीच गेला.रानी पिकं करपलं,सारी स्वप्न भंग झाली.याची जाण आहे भान आहे म्हणून हे वास्तव आक्रंदन-मातीचे आले आहे.रानाचा खोटा अंभग मनाचा पिळ पिळवटून काढतो.तर 'टंटणीचं फुल' ही जशी जंगलाची आयुर्वेदिक औषधी वनस्पती तशी सखीच्या रुपाची भुरळ अन् किरळ लावणारी कविता "अशी मारून फुंकर, तुझं सोडवेन डुलं, पुन्हा शोधाया फिरेन, माझं टंटणीचं फुलं" (पृष्ठ ९१)मनाचे सावत्र हुंदके देत,तुझी ओढणी कुण्यातरी विदेशी गुलाबाच्या झुडपात आडकली.ही सखेद वेदनेची ओळ.मोराचे डोळे टिचून टाकते.या कवितेची भवर भिंगरी होऊन आपल्या सृजनशील ओढाळ मानाच्या काठावर,कधी रानं शिवार बांधावर,कधी झाडाच्या फांद्या वर,कधी कोवळ्या उन्हात हळूच मोरपिसारा फुलवून तिच्या मनमुक्त स्वैर विभोर होऊन ही कविता ग्रेसफूल होऊन जाते.'साधी गोष्ट' तिच्या चित्तात अतुर मन दचकून उठते.कधी काळोखाच्या खांद्यावर डोकं ठेवून फक्त तिचा आठव.मरणाच्या अंबर भेटी,केवळ आठवांची वणवण.असे काव्याचे मनमुग्ध शेलाटे अंग जणू क्षितीजभर व्हावे.साऱ्या प्रेमाचा आभाळभरं रंग क्षितीज माखून घेतो.ही काव्याची आराधना मन व्याकुळ करून जाते.कवी मनातली जळमटं विघ्नहर्त्या जयदिपाने रानभर उजळून निघतात.इतकी निस्सीम काव्यभक्ती या कवितेची आहे.ती कविता अशी,"मनचक्षू वाऱ्यावर पायी भवरभिंगरी, एका वेड्याच्या डोळयांत. खोल रूजलेली दरी"(पृष्ठ ९६) इथं अक्षर बोलतात.समग्र प्रकाशन यांचे अतिशय देखणी बांधणी.'मनमस्तिष्कांचे रक्तरंग' लक्षवेधी मुख्यपृष्ठ संतोष धोंगडे पुणे याचे आहे.कवीच्या मनोगतांचा ठाव म्हणजे 'पायी भिंगरी असणाऱ्या तुमच्या माझ्यातल्या समृद्ध हुरहुरीला"... कवीस्नेही जयदिप विघ्ने यांना मनस्वी शुभेच्छा.



**पुस्तक:-भवर भिंगरी (कवितासंग्रह)**
**कवी:-जयदिप विघ्ने, देऊळगाव राजा**
**प्रकाशक:-देवीदास पाटील, तुळजापूर**
**समग्र प्रकाशन:-तुळजापूर,जि.धाराशिव.**
**मुखपृष्ठ:-संतोष धोंगडे, पुणे**
**प्रथमावृती:- शुक्रवार दि.२जानेवारी २०२६**
**किंमत:-२००/**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**
**संपर्क:-९९७५१३७३३७**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० फेब्रुवारी २०२६


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात संपन्न






**जालना :** छत्रपती शिवाजी महाराजांनी सातत्याने येथील रयतेच्या कल्याणाचा विचार केला. सत्ता ही समाजाच्या कल्याणासाठी उपयोगात आणायची याची कृतीशील अंमलबजावणी त्यांनी केली. कोणालाही त्यांनी असमानरित्या वागवले नाही. म्हणून शिवाजी राजे महाराष्ट्रातल्या सर्वांनाच आपलेसे वाटतात. आपल्या सर्वांच्या मनात त्यांच्याबद्दल मोठा आदर आहे असे प्रतिपादन प्रा.बळीराम कटारे यांनी केले. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात शिवजयंतीच्या निमित्ताने ते विचार व्यक्त करत होते. प्रारंभी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

पुढे ते म्हणाले की, मध्ययुग हे एक अंधारयुग होते. जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रांमध्ये गंभीर आणि चिंताजनक परिस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने सतराव्या शतकात हा अंधकार भेदला. शिवरायांनी स्वराज्य स्थापन केल्यानंतर जो राज्यकारभार केला तो न्यायावर आधारित होता. रयतेचे कल्याण हे या स्वराज्याचे ध्येय होते. सर्व धर्मीयांप्रती सहिष्णूभाव, स्त्रियांच्या प्रती तेवढाच सन्मानपूर्वक दृष्टिकोन, शेतकऱ्यांच्याप्रति आदर आणि सन्मानाची भावना तसेच राज्यकारभार करताना सतत सामाजिक न्यायाला प्राधान्य दिले जगामध्ये सहिष्णूतेचा इतिहास लिहिण्याचे ठरले तर छत्रपती शिवाजी महाराजांचं जीवन कार्य फार मौल्यवान ठरेल. आपल्या पन्नास वर्षाच्या आयुष्यात अलौकिक कार्य शिवाजी राजांनी केले. वर्तमान मूल्य घसरणीच्या काळात शिवाजी राजांचे विचार प्रासंगिक आहेत.

यावेळी गायत्री टाकळकरने लाठी-काठी चालवून उपस्थितांचे मन जिंकले. पल्लवी धनगर हिने जिजाऊंच्या वेषभूषेमध्ये एकपात्री प्रयोग सादर केला. यावेळी डॉ. प्रियदर्शन भवरे, प्रा. विलास भुतेकर, डॉ. कालिदास सूर्यवंशी, डॉ. सुनिता भराडे, डॉ. रवींद्र भोरे, डॉ. रवींद्र शिंपी, प्रा. अभिजीत भुतेकर, प्रा. अभिषेक ढेंबरे, डॉ. अशोक काकडे, डॉ. सचिन चव्हाण, डॉ. चंद्रकांत धोत्रे, प्रा. प्रमोद अवचार, प्रा. योगिता ढेंगळे, विजय लोणकर, चैताली पाटील, वैशाली चोपडे, यशोदा डिघे यांच्यासह वस्तीगृहातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या.






## भगवान विद्यालय आडगाव (बु.) येथे शिव जयंती साजरी




**आडगाव बु. :** येथील भगवान विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरी करण्यात आली प्रमुख पाहुणे श्री मच्छिंद्र पा. घोरपडे हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य संजय देसले हे होते. याप्रसंगी कुमारी दिव्या लोखंडे ज्ञानेश्वरी साळुंखे आनन्या लोखंडे गार्गी जाधव ऋतुजा रसाळ श्रुती दसपुते इत्यादी विद्यार्थिनींनी छत्रपती शिवरायांचा जीवन कार्याचा परिचय करून दिला याप्रसंगी राजेंद्र पगारे देविदास शिरसाठ बाबासाहेब बडधे ऋषिकेश चाथे मनोहर विटकर छाया कणसे सुनील बनसोडे संगीता पाटील इत्यादींची उपस्थिती होती तसेच गावातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळा चिकलठाणा येथे शिवजयंतीचा उत्साह





**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक पी.पी. शिंदे सर होते, तर प्रमुख अतिथी श्रीमती तारो मॅडम श्रीमती शिंदे मॅडम होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री चव्हाण सर यांनी केले. छोट्या शिवभक्तांनी विविध पोवाडे व भाषणे सादर केली. या कार्यक्रमासाठी श्री. राठोड सर, सूर्यवंशी सर, श्रीमती भारद्वाज मॅडम, कानडे मॅडम, कवठेकर मॅडम, फुलंब्रीकर मॅडम,पठाण सर भींगोले मॅडम, भोसले मावशी उपस्थित होते. श्री. शिंदे सरांनी अध्यक्ष समारोप करत, श्रीमती भिंगोले मॅडम यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २० फेब्रुवारी २०२६

# छत्रपती शिवाजी महाराज यांचे नेतृत्वगुण व आजचा युवक

*दूरदृष्टी (Vision)* छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी ही त्यांच्या नेतृत्वाची सर्वांत मोठी ताकद होती. लहान वयातच त्यांनी "हिंदवी स्वराज्य" ही संकल्पना मांडली आणि ती केवळ स्वप्नरंजन न ठेवता प्रत्यक्षात उतरविण्याचा निर्धार केला. त्या काळात परकीय सत्तांचा प्रभाव प्रचंड होता; तरीही त्यांनी भविष्यातील स्वतंत्र, स्वाभिमानी आणि लोककल्याणकारी राज्याची कल्पना केली. त्यांनी किल्ल्यांची उभारणी, सुदृढ प्रशासन, सक्षम आरमार आणि प्रशिक्षित सैन्य यांद्वारे स्वराज्याची पायाभरणी केली. त्यांच्या प्रत्येक कृतीमागे दीर्घकालीन विचार आणि परिणामांचा अंदाज दिसून येतो. आजच्या युवकांसाठी ही दूरदृष्टी अत्यंत महत्त्वाची आहे. करिअर, शिक्षण किंवा व्यवसाय कोणताही क्षेत्र असो, स्पष्ट ध्येय, नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांची जोड असेल तर यश निश्चित मिळते. तात्कालिक फायद्यांपेक्षा दीर्घकालीन उद्दिष्टांकडे लक्ष देणे हीच शिवरायांची शिकवण आहे.

*धैर्य व निर्णयक्षमता* शिवाजी महाराजांचे धैर्य हे केवळ रणांगणापुरते मर्यादित नव्हते, तर ते त्यांच्या निर्णयक्षमतेतही प्रकर्षाने दिसून येते. संकटसमयी त्यांनी कधीही गोंधळ न करता शांतपणे परिस्थितीचे विश्लेषण केले आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेतला. शत्रूंच्या प्रबळ सैन्याचा सामना करताना त्यांनी आत्मविश्वास ढळू दिला नाही. अनेक प्रसंगी त्यांनी धाडसी निर्णय घेत स्वराज्याचे रक्षण केले. धैर्य म्हणजे केवळ शारीरिक ताकद नव्हे, तर मानसिक स्थैर्य आणि आत्मविश्वास होय, हे त्यांनी दाखवून दिले. आजच्या युवकांसाठी हा गुण अत्यंत आवश्यक आहे. स्पर्धा, अपयश, ताणतणाव यांचा सामना करताना खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे. योग्य निर्णय घेण्याची क्षमता आणि त्याची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी असेल, तर कोणतीही अडचण पार करता येते. धैर्य आणि निर्णयक्षमता यांची सांगड घातल्यास यशाचा मार्ग सुकर होतो.

*संघटन कौशल्य* शिवाजी महाराजांचे संघटन कौशल्य अद्वितीय होते. त्यांनी सामान्य मावळ्यांना एकत्र करून त्यांच्यात स्वराज्याची भावना जागवली आणि त्यांना शिस्तबद्ध, निष्ठावंत सैन्यात परिवर्तित केले. प्रत्येक व्यक्तीच्या गुणांची ओळख करून त्यानुसार जबाबदाऱ्या दिल्या. योग्य व्यक्तीला योग्य काम देण्याची त्यांची पद्धत राज्यकारभारातही दिसून येते. त्यांच्या नेतृत्वाखालील सहकाऱ्यांमध्ये विश्वास, निष्ठा आणि समर्पणाची भावना होती. संघटन म्हणजे केवळ लोकांना एकत्र आणणे नव्हे, तर त्यांना एका ध्येयासाठी प्रेरित करणे होय, हे त्यांनी सिद्ध केले. आजच्या युवकांसाठी टीमवर्क आणि सहकार्याची भावना अत्यंत महत्त्वाची आहे. कोणतेही मोठे यश एकट्याने मिळत नाही; त्यासाठी समन्वय, संवाद आणि विश्वास आवश्यक असतो. शिवरायांचे संघटन कौशल्य हे आधुनिक व्यवस्थापनशास्त्रालाही प्रेरणा देणारे आहे.

*शिस्त आणि वेळेचे महत्त्व* शिस्त ही शिवाजी महाराजांच्या सैन्याची ओळख होती. प्रत्येक मोहिमेचे सूक्ष्म नियोजन, वेळेचे काटेकोर पालन आणि नियमांचे कठोर अनुसरण यामुळे त्यांच्या मोहिमा यशस्वी ठरल्या. त्यांनी सैन्यात नैतिक शिस्त आणि जबाबदारीची भावना निर्माण केली. त्यांच्या दृष्टीने शिस्त म्हणजे स्वातंत्र्याला मर्यादा नव्हे, तर त्याचे रक्षण करणारे साधन होते. वेळेचे महत्त्व ओळखून त्यांनी प्रत्येक निर्णय योग्य वेळी घेतला. विलंबामुळे संधी हातातून निसटते, हे त्यांना ठाऊक होते. आजच्या युवकांनीही वेळेचे नियोजन आणि स्वअनुशासन अंगीकारणे आवश्यक आहे. यशस्वी होण्यासाठी सातत्य, नियमबद्धता आणि वेळेचा योग्य वापर अनिवार्य असतो. शिस्तबद्ध जीवनशैलीमुळे व्यक्तिमत्त्वात स्थैर्य आणि विश्वासार्हता निर्माण होते. शिवरायांचे जीवन हे याचे सर्वोत्तम उदाहरण आहे.

*स्त्रीसन्मान व नैतिकता* शिवाजी महाराजांनी स्त्रीसन्मानाला सर्वोच्च स्थान दिले. शत्रुराष्ट्रातील महिलांनाही सन्मानपूर्वक वागणूक देण्याचे कठोर आदेश त्यांनी दिले होते. त्यांच्या राज्यात स्त्रियांच्या सुरक्षिततेला विशेष महत्त्व होते. त्यांनी नैतिक मूल्यांचे काटेकोर पालन केले आणि आपल्या सैन्यालाही त्याच तत्त्वांचे पालन करण्यास प्रवृत्त केले. त्या काळातील युद्धप्रसंगीही त्यांनी मानवी मूल्यांची जोपासना केली, हे त्यांच्या उच्च चारित्र्याचे द्योतक आहे. आजच्या युवकांसाठी हा गुण अत्यंत आवश्यक आहे. प्रगतीसोबत संस्कार आणि नैतिकता टिकवून ठेवणे हीच खरी यशाची ओळख आहे. समाजात सन्मान, संवेदनशीलता आणि जबाबदारीची भावना जोपासली तरच खऱ्या अर्थाने नेतृत्व घडते. शिवरायांचा स्त्रीसन्मानाचा आदर्श आजही तितकाच प्रेरणादायी आहे.

*धार्मिक सहिष्णुता* शिवाजी महाराजांनी सर्व धर्मांचा आदर केला आणि राज्यकारभारात कोणत्याही प्रकारचा भेदभाव होऊ दिला नाही. त्यांच्या सैन्यात आणि प्रशासनात विविध धर्मीय व्यक्ती कार्यरत होत्या. त्यांनी मंदिरांसोबत मशिदींचाही सन्मान राखला. धार्मिक सहिष्णुता ही त्यांच्या स्वराज्याची मूलभूत तत्त्वे होती. विविधतेत एकता राखणे आणि सर्वांना समान न्याय देणे हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य होते. आजच्या जागतिक आणि बहुसांस्कृतिक समाजात युवकांनीही ही भावना जोपासणे आवश्यक आहे. मतभेद असले तरी मनभेद टाळणे आणि परस्पर आदर राखणे हीच खरी प्रगतीची वाट आहे. सामाजिक सलोखा आणि एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी सहिष्णुता हा अनिवार्य गुण आहे. शिवरायांचा हा आदर्श आधुनिक लोकशाही मूल्यांशी सुसंगत आहे.

*स्वाभिमान व राष्ट्रभक्ती* शिवाजी महाराजांचा स्वाभिमान आणि राष्ट्रभक्ती हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गाभा होते. त्यांनी परकीय सत्तेच्या दडपशाहीविरुद्ध आवाज उठवून स्वराज्याची स्थापना केली. मातृभूमीप्रती असलेली निष्ठा आणि जनतेप्रती असलेली जबाबदारी यामुळे त्यांनी प्रत्येक निर्णय घेतला. स्वाभिमान म्हणजे अहंकार नव्हे, तर स्वतःच्या संस्कृतीचा आणि मूल्यांचा अभिमान होय, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. आजच्या युवकांनीही देशहित आणि समाजहित यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या युगात प्रगती करताना आपल्या संस्कृतीशी नाळ जोडून ठेवणे महत्त्वाचे आहे. राष्ट्रभक्ती ही केवळ घोषणांत नसून कृतीत असावी, हीच शिवरायांची शिकवण आहे.

*नवकल्पकता (Innovation)* शिवाजी महाराजांनी युद्धनीतीत आणि प्रशासनात अनेक नवकल्पना राबवल्या. गनिमी काव्याच्या तंत्राने त्यांनी बलाढ्य शत्रूंना पराभूत केले. समुद्री आरमार उभारून किनारपट्टीचे संरक्षण केले, जे त्या काळात दूरदृष्टीचे पाऊल होते. त्यांनी पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता परिस्थितीनुसार नवे उपाय शोधले. बदलत्या परिस्थितीत लवचिकता आणि सर्जनशीलता दाखवणे हे त्यांच्या यशाचे रहस्य होते. आजच्या युवकांसाठीही नवकल्पकता अत्यंत महत्त्वाची आहे. तंत्रज्ञान, उद्योग, शिक्षण किंवा सामाजिक क्षेत्र असो, नवनवीन कल्पना आणि प्रयोगशीलता यामुळेच प्रगती साध्य होते. अपयशाची भीती न बाळगता नवीन मार्ग शोधण्याची वृत्ती अंगीकारणे आवश्यक आहे. शिवरायांची नवोन्मेषी वृत्ती आधुनिक काळातही तितकीच सुसंगत आणि प्रेरणादायी आहे.



**लेखक**
**डॉ नामदेव वैजनाथ कचरे**
**भूगोलशास्त्र विभाग**
**डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**

